नि.फौ.ख.–३८२/२०२४
नि.क्र. २६

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.1 यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – कल्पना नितीन म्हसे
वय – ४८ वर्षे,
व्यवसाय – शेती
राहणार – रा. शिलेगाव, ता. राहुरी जि.अ.नगर

**<u>सरतपासणी – सहा.सरकारी अभियोक्ता श्री.आर.के.गागरे</u>**

१. मी आरोपीला ओळखते. ते आमच्या शेजारी राहतात. घटना ही २०२४ मध्ये घडली. घटनेच्या वेळी आरोपीसोबत माझी किरकोळ बाचाबाची झाली होती. त्यामुळे मी आरोपीविरूद्ध फिर्याद दिली होती. असे काही घडले नाही की, १८/०५/२०२४ रोजी सायं.०६.३० च्या सुमारास आरोपीने जुन्या भांडणाच्या कारणामुळे शिवीगाळ केली व आरोपी क्र. २ याने माझ्या साडीचा पदर ओढला व माझ्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावरील सही माझी आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीला ओळखीपूरती **नि.२७** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोगपक्षाच्या बाजूने साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १८/०५/२०२४ रोजी सायं. ०६.३० च्या सुमारास मी शेतामध्ये काम करत असताना आमच्या शेती शेजारी असणारे आरोपी यांनी मला जुन्या भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ केली. तसेच आरोपी क्र. २ याने माझ्या साडीचा पदर ओढला व माझ्या मनास लज्जा होईल असे कृत्य केले तसेच आरोपी क्र. १ हिने माझा हात पिरगळला व मला बुक्का मारला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला शिवीगाळ करून मला व माझ्या पतीला लाथाबुक्क्याने मारहाण केली व जिवेठार मारण्याची धमकी दिली. फिर्याद दिल्यानंतर मी न्यायालयात जबाब देण्यासाठी आले नव्हते. मी मारहाण झाल्यानंतर दवाखान्यात उपचार घेतला नव्हता. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित 'भाग अ' वाचून दाखवण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता पोलीसांनी का लिहून घेतला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे आमच्या गावातील रहिवासी असल्यामुळे आमच्यात तडजोड झाली असून

नि.फौ.ख.–३८२/२०२४
नि.क्र. २६

सदर पुरसीस (**नि.क्र. २५**) मी न्यायालयात दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत तडजोड झाल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपीतर्फे उलट तपास विधीज्ञ बी. एस. बाचकर यांच्यातर्फे**

**आरोपींनी उलटतपास नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2026.02.17 17:20:37 +0530

राहुरी

दिनांक – १७/०२/२०२६.

**(श्री. पी. एच. पाटील)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२,राहुरी